### कल्पक होऊया

- हरवलेले बदकाचे पिल्लू आपल्या आईला पत्र लिहीत आहे अशी कल्पना कर व पत्र लिही.

---

**दिवस – ०६**

# ६. बातमीवाचन

**क्षेत्र : वाचन**

**अध्ययन निष्पत्ती :**

**05.01.04 :** विविध प्रकारच्या साहित्यातील (उदा., वर्तमानपत्रे, बालसाहित्य, पोस्टर इत्यादीमधील) संवेदनशील मुद्द्यांवर आपले मत/विचार व्यक्त करतात.

**05.01.06 :** आपल्या पाठ्यपुस्तकाच्या आधारे इतर साहित्य (वर्तमानपत्रे, बालसाहित्य, मोठे फलक इत्यादी) समजून घेऊन वाचन करतात, त्याविषयी बोलतात.

### पूर्वज्ञान जागृत करूया

- शिक्षकांनी वर्तमानपत्रातील बातम्यांसंदर्भात विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावेत.

  जसे : १) तुम्ही बातम्या कोठेकोठे ऐकता व पाहता?

  २) बातम्या कोणत्या विषयांवर असतात?

  ३) बातम्या का ऐकल्या/पाहिल्या पाहिजे?

### सक्षम बनूया

- शिक्षकांनी बातमी वाचन याविषयी मार्गदर्शन करावे. जसे : बातमीचे उद्देश, आवश्यकता, बातमीचे वाचन, लेखन, बातमीतील विश्वासार्हता, बातमीची प्रसारमाध्यमे, बातमीचे विषय इत्यादी बाबी सांगाव्यात.

**कृती : खालील बातमी बारकाईने वाच व त्यावर आधारित प्रश्न तयार कर.**

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे आलेल्या पुरामुळे ५० जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यांपैकी ११ लोकांचा मृत्यू एकट्या रत्नागिरी शहरात झाला आहे, अशी माहिती गुरुवारी राज्य सरकारकडून देण्यात आली. मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची नुकसान भरपाई जाहीर केली आहे; तसेच नुकसानग्रस्तांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. ज्यांच्या घराचे पूर्णपणे नुकसान झाले आहे, त्यांना नवीन घर दिले जाईल. जर घराचे अर्धवट नुकसान झाले असेल, तर दुरुस्तीसाठी आर्थिक साहाय्य केले जाईल.

**सराव करूया**

कृती : वरील बातमीतील पूरग्रस्तांना मदत होण्यासाठी काय करता येईल, असे तुला वाटते ते लिही.

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

कृती : पाठ्यपुस्तके, वर्तमानपत्रे, ई–वर्तमानपत्रे इत्यादींमध्ये आलेल्या विविध विषयांवरील (उदा., शिक्षण, आरोग्य, क्रीडा, आपत्ती इत्यादी संदर्भातील) बातम्या वाच. मित्रांबरोबर चर्चा कर.

कृती : शिक्षण, खेळ, आरोग्य, परिसरातील घटना यासंबंधित बातम्यांचा कोलाज तयार कर.

**कल्पक होऊया**

कृती : गारपीट झाल्यामुळे शेतीचे नुकसान झाले आहे. याची बातमी तयार कर व वहीत लिही.

कृती : शाळेच्या ग्रंथालयातील बालसाहित्य मिळवून त्यातील कथा वाच. त्यातील तुला आवडलेली कथा वर्गात सांग.

---

**दिवस – ०७**

# ७. शब्दांचे सामान्यरूप

**क्षेत्र : भाषाभ्यास**

**अध्ययन निष्पत्ती :**

05.01.10 : भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक (उदा., विरामचिन्ह, काळ, क्रियापद, लिंग, वचन) ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

**पूर्वज्ञान जागृत करूया**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना फळ्यावर लिहिलेले पुढील वाक्य वाचण्यास सांगावे.

पुढील वाक्य वाच. **मी पुस्तक घाई नव्हती.**

कृती : शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाक्यातील प्रत्येक शब्दाचा दुसऱ्या शब्दाशी काहीतरी संबंध आहे असे वाटते का? असे विचारून वरील वाक्यावरून तुम्हाला काय समजले ते सांगा? वरील वाक्य समजण्यासाठी किंवा अर्थ स्पष्ट होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मदतीने क्रियापदाला अनुसरून खालीलप्रमाणे काही प्रश्न विचारावे.